# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर
# दिनांक २४/११/२०२० (मंगळवार)

---

## घरफोडी

१) पोलीस ठाणे बुटीबोरी :– अंतर्गत वार्ड नं. ०५, पाण्याचे टाकीजवळ, बुटीबोरी निवासी फिर्यादी नामे सौ. उषा शत्रुघ्न शाहु या दिनांक २२/११/२०२० चे ११.३० वा. दरम्यान दुकाणात कपडे खरेदीकरीता गेल्या असता एका अज्ञात सायकलस्वार महिलेने त्यांना किरायाच्या रुमबाबत विचारण केली. यावर फिर्यादी या सदरहु अज्ञात महिलेस आपले घरी घेवुन गेल्या. त्यांनंतर अज्ञात महिलेने फिर्यादी यांना कंपनीत कामावर लावुन देण्याचे आमिष दाखवुन त्यांच्या फोटोची मागणी केली. फिर्यादी आणि तिची मोठी मुलगी अज्ञात महिलेसोबत पवार फोटो स्टुडीओ येथे गेल्या असता अज्ञात महिलेने माझा कोट तुमच्या घरी राहिला आहे, तुम्ही बस स्टाफपवर थांबा, मी कोट घेवुन येते असे सांगुन फिर्यादीचे घरी जावुन घरी हजर असलेल्या फिर्यादीच्या लहान मुली समक्ष घरात घुसुन अलमारीत ठेवलेले सोन्याचे दागीने एकुण किं. ५६,००० रू., नगदी ५,००० रू. व १ माबाईल फोन किं. ३,००० रू. असा एकुण ६४,००० रू. चा माल चोरून नेला. सदर प्रकरणी अज्ञात महिला आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे बुटीबोरी येथे फिर्यादीचे तोडी रिपोर्टवरुन कलम ४५४, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री मिलिंद नुादुरकर हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

२) पोलीस ठाणे जलालखेडा :– अंतर्गत पेट्रोलपंपचे बाजुला, जलालखेडा निवासी फिर्यादी नामे मधुकर परशुराम सावरकर, वय ८० वर्षे हे नोतवाईकाकडे गेले असता दिनांक २२/११/२०२० चे रात्रीदरम्यान कोणतरी अज्ञात चोरांनी त्यांचे घराचे लॉक तोडुन बेडरुममधील लाकडी कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने एकुण किं. ११,००० रू. व पुचेजे नगदी २००० रू. ची चिल्लर असा एकुण १३,००० रू. चा माल चोरून नेला. सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे जलालखेडा येथे फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरुन कलम ४५७, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक श्री रंजित रोकडे हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

३) पोलीस ठाणे उमरेड :– अंतर्गत प्लॉट नं. ४९, घटाळी रोड, बालाजी नगर निवासी फिर्यादी श्रीमती योगिता पवन यादव, वय ३८ वर्षे या दिनांक २२/११/२०२० चे १९.०० वा ते २३/११/२०२० चे ०७.०० वा. दरम्यान आपले घराला कुलुप लावुन मुलाबाबळासह उमरेड येथे

आपले वडिलांकडे गेल्या असता कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी फिर्यादीचे राहाते बंद घराचे समोरील दाराचे कुलुप तोडुंन आलमारीत ठेवलेले १) ३० ग्रॅम सोन्याची पोत किं ७५,०००/— रू २) १५ ग्रॅम सोन्याचा गोप किं ३७,५००/— रू ३) १० ग्रॅम सोन्याचे कानातील टॉप्स कि. २५,०००/— रु. ४) ३ ग्रॅम नाकातील नथनी किं ७,५००/— रु. ५) व्हीडीओकॉन कंपनीची टिव्ही किं ५,०००/— रू ६) लाल काळसर रंगाच्या ३ साडया किं १,८००/— रू अशा एकुण किं. १,५१,८००/— रू चा माल चोरुन नेला. सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे उमरेड येथे फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरुन कलम ४५७, ३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सह. पोलीस निरीक्षक श्री डोर्लीकर हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

## चोरी

१) पोलीस ठाणे काटोल :— अंतर्गत कारला येथील फिर्यादी नामे हरीश बाबुलाल मोरोलिया, वय ३६ वर्षे यांनी दिनांक २२/११/२०२० चे २३.४५ ते २३/११/२०२० चे ०५.०० वा. दरम्यान आपले घराचे अंगणासमोर त्यांची होंडा शाईन मोटार सायकल क्र. एम. एच. ४०/व्ही ८९८० किंमत २०,०००/— रु. ची उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट करुन अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे काटोल येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सह. पोलीस उपनिरीक्षक श्री जवाहर चव्हान हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

२) पोलीस ठाणे सावेनर :— अंतर्गत वार्ड क्र. १७, पहलेपार, सावनेर येथील फिर्यादी नामे उदयसिंग नरसिंग हजार यांनी २३/११/२०२० रोजी ०७.०० वा. दरम्यान मोटार सायकल क्र. एमएच—४० एबी ०४१६ किमंत १०,००० ही मौजा किललेपार येथे मावशीच्या घरासमोर उभी ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेली. सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे सावनेर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री बोरकर हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

३) पोलीस ठाणे खापा :— अंतर्गत मौजा कोच्छी येथील फिर्यादी नामे प्रल्हाद देवराव आश्राम, वय ४० वर्षे यांनी २२/११/२०२० रोजी १४.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान मोटार सायकल क्र. एमएच ४०/बीएस ३४३८ किं. ४०,०००/— रू ही रोडचे बाजुला उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे खापा येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री गंगाधर ठाकरे हे करीत असुन अज्ञात आरोपीचा शोध सुरु आहे.

## निष्काळजीपणे भरधाव वेगाने वाहन चालवुन मरणास कारणीभुत (अपघात)

१) पोलीस ठाणे पारशिवनीः— अंतर्गत दिनांक २३/११/२०२० चे १०.३० वा. दरम्यान मौजा सावळी शिवारात स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ३१/एम ६८६४ चा चालक रामदास निलकंठ पांडे, रा. सावंगी (भयाजी) याने आपले दुचाकी वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने झालेल्या अपघातात त्याचे मोटार सायकलवर बसलेली त्याची बहीण उमाबाई अशोक कुंडे, वय ६० वर्षे ही मोटार साकलचे खाली पडुन डोक्याला मार लागल्याने जागीच मरण पावली. सदर प्रकरणी श्री अंकुश शेषराव वानखेडे, वय ४२ वर्षे, रा. वाघोली यांचे तक्रारीवन मोटार सायकल चालक रामदास निलकंठ पांडे, रा. सावंगी (भयाजी) विरुद्ध पोलीस ठाणे पारशिवनी येथे कलम २७९, ३०४(अ) भादंवी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हृयाचा तपास महिला पोलीस हवालदार श्रीमती संगिता कोवे या करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर.